# ठाणे शहरात बेकायदेशीर शस्त्रांची विक्री करण्यासाठी आलेल्या हद्दपार गुन्हेगारास मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाकडून अटक



■ **ठाणे प्रतिनिधी:** ठाणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेला एक सराईत आरोपी अनधिकृत पिस्तूल आणि जिवंत काडतुसे विक्रीसाठी घेऊन आल्याची माहिती मिळताच, मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष ठाणे शहरच्या पथकाने सापळा रचून त्याला कळवा परिसरातून रंगेहाथ जेरबंद केले.

वाहिद मंजूर खान असे अटक करण्यात आलेल्या २३ वर्षीय आरोपीचे नाव असून तो कल्याण पश्चिम येथील रहिवासी आहे. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल जाधव यांना खबरीमार्फत माहिती मिळाली होती की, ठाणे, मुंबई आणि उपनगरांतून १२ महिन्यांसाठी हद्दपार केलेला वाहिद खान हा कळवा येथील रेतीबंदर परिसरातील अग्निशमन केंद्राजवळील सर्व्हिस रोडवर देशी बनावटीचे पिस्तूल विकण्यासाठी येणार आहे. या बातमीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खाडे व त्यांच्या पथकाने पंचांसमक्ष परिसरात सापळा रचला. संशयित आरोपी वाहिद खान तिथे येताच पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ९२,६०० रुपये किमतीची दोन देशी बनावटीची पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे बेकायदेशीरपणे बाळगल्याचे उघडकीस आले. तसेच हद्दपारीचा आदेश लागू असतानाही कोणतीही पूर्वपरवानगी न घेता त्याने शहरात प्रवेश करून आदेशाचे उल्लंघन केल्याचे समोर आले.

याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त अमरसिंह जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल जाधव, सपोनि नितीन खाडे, प्रकाश दिनकर, पोउनि सुरेश माळोदे आणि मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाच्या पथकाने पार पाडली.

# डोंबिवलीत रोटरी क्लबतर्फे भावनिक बुद्धिमत्ता व सहानुभूती विषयावर प्रशिक्षण






■ **डोंबिवली प्रतिनिधी:** रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्स यांच्या वतीने रोटरी वर्ष २०२६-२७ अंतर्गत ओम हॉस्पिटल ओॲसिस यांच्या सहकार्याने व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम १ ऑगस्ट २०२६ रोजी ओम हॉस्पिटल, डोंबिवली येथे उत्साहात पार पडला.

'भावनिक बुद्धिमत्ता व सहानुभूती' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणात नर्सेस, आरएमओ, हाऊसकीपिंग कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना रुग्णांशी सहानुभूतीपूर्ण संवाद कसा साधावा, सक्रिय ऐकण्याचे महत्त्व काय आहे.विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी संवेदनशीलतेने कसे वागावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णसेवेत करुणा, समजूतदारपणा आणि मानवी मूल्ये जपणे ही दर्जेदार आरोग्यसेवेची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान प्रभावी संवाद कौशल्ये, टीमवर्क आणि सेवाभाव यांचे महत्त्वही उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.

रोटरीच्या व्होकेशनल सर्व्हिस उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांबरोबरच संवेदनशील सेवाभाव अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ओम हॉस्पिटलच्या मेडिकल डायरेक्टर तथा प्रकल्प प्रमुख डॉ. वंदना शरद धाकटोडे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्सचे अध्यक्ष रोटेरियन कुंदन नेमाडे, सचिव रोटेरियन जगदीश एच. तांबट आणि खजिनदार रोटेरियन ॲड. सागर दुसेने यांची प्रमुख उपस्थिती होती.